**महाराष्ट्र चित्रपट,रंगभमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित**

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५.

---

# जाहिरात

**"कनिष्ठ अभियंता" व "तांत्रिक सहाय्यक" हे पद कंत्राटी तत्वाने भरणेबाबत.**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या. गोरेगांव (पू.) मुंबई येथे कार्यरत असून महामंडळाच्या सुमारे ५२१ एकर परिसरातील जागेतील बाह्य चित्रिकरण स्थळे, कलागारे व इतर इमारतींचे कामावर देखरेख, अंदाजपत्रके, निविदा व पत्रव्यवहार इत्यादी कामाकरीता कनिष्ठ अभियंता यांची नियुक्ती प्रस्तावित आहे.

करीता महामंडळात "कनिष्ठ अभियंता" यांची कंत्राटी तत्वाने ११ महिनेसाठी (कालावधी कमी/जास्त करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.) खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुलाखतीद्वारे भरणेकरीता खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे:-

- **पद:- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**

१. **पदसंख्या** :- ५

२. शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि वयोमर्यादा :-

अ. शैक्षणिक पात्रता:- उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान स्थापत्य अभियांत्रिकी विभागाची पदवी घेतलेली असावी.

आ. अनुभव :- स्थापत्य कामाचा विविध प्रकारच्या क्षेत्रीय कामाचा अनुभव आवश्यक किमान ३ वर्षांचा अनुभव मुख्यत: इमारती दुरुस्ती बांधकाम, रस्ते, पाणीपुरवठा, आवार भिंत देखभाल दुरुस्ती इत्यादी.

इ. उमेदवाराला मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.

ई. वयोमर्यादा:- ४० वर्षे पेक्षा जास्त नसावे.

उ. संगणक वापरण्याचे ज्ञान आवश्यक आहे.

३. **वित्तलब्धी** :- मासिक ठोक मानधन रु. ४७,२००/-

- **पद:- तांत्रिक सहाय्यक (स्थापत्य)**

१. **पदसंख्या** :- ५

२. शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि वयोमर्यादा :-

अ. शैक्षणिक पात्रता:- उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान स्थापत्य अभियांत्रिकी विभागाची पदविका (Diploma) घेतलेली असावी.

आ. अनुभव :- स्थापत्य कामाचा विविध प्रकारच्या क्षेत्रीय कामाचा अनुभव आवश्यक किमान ३ वर्षांचा अनुभव मुख्यत: इमारती दुरुस्ती बांधकाम, रस्ते, पाणीपुरवठा, आवार भिंत देखभाल दुरुस्ती इत्यादी.

इ. उमेदवाराला मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.

ई. वयोमर्यादा:- ४० वर्षे पेक्षा जास्त नसावे.

उ. संगणक वापरण्याचे ज्ञान आवश्यक आहे.

३. **वित्तलब्धी** :- मासिक ठोक मानधन रु. २४,४००/-

वरील अर्हता धारण करण्याऱ्या उमेदवारांनी आवश्यक अर्हता, अनुभव वयाच्या पुराव्याबाबतची कागदपत्रे, साक्षांकित कागदपत्रासह विहीत नमुन्यात खालील पत्यावर डाकद्वारे किंवा filmcitycao@gmail.com या इमेल आयडीवर ऑनलाईन दि.२८.०३.२०२५ सायं. ५ वाजे पर्यंत अर्ज पोहचेल असा करावा.

प्राप्त होणाऱ्या अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार छाननी करुन पात्र उमेदवारांपैकी उमेदवारांचा अर्हता, अनुभव व वयोमर्यादा विचारात घेऊन सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल सुयोग्य उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याचे किंवा नाकारण्याचे सदर प्रक्रीया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व हक्क महामंडळ राखून ठेवत आहेत. मुलाखतीचा दिनांक व वेळ पात्र उमेदारांना यथावकाश कळविण्यात येईल.

स्वाक्षरी
व्यवस्थापकीय संचालक,
म.चि.र.व सां.वि.म. मर्यादित

# कनिष्ठ अभियंता  या पदासाठी अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | जन्म तारीख | |
| ३ | पत्र व्यवहारासाठी पत्ता | |
| ४ | ई- मेल | |
| ५ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | एकुण अनुभव | |
| ८ | MS-CIT & CDAC ची परिक्षा उत्तीर्ण तपशिल | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

# तांत्रिक सहायक या पदासाठी अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | जन्म तारीख | |
| ३ | पत्र व्यवहारासाठी पत्ता | |
| ४ | ई- मेल | |
| ५ | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |
| ६ | शैक्षणिक अर्हता | |
| ७ | एकुण अनुभव | |
| ८ | MS-CIT & CDAC ची परिक्षा उत्तीर्ण तपशिल | |

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी